सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.**
**शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.**
**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org **Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**कार्यासन क्रमांक २/३**

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२४/3083
दिनांक :- 08 OCT 2024

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या शैक्षणिक संस्थांनी शिष्यवृत्तीची रक्कम जमा होणा-या बॅक खात्यामध्ये बदल केल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

**संदर्भ :-** १.मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १८/तंशिस/डीबीटी/विकाप/२०२४/३८९ दिनांक ७/१०/२०२४.
२.उच्च व तंत्रशिक्ष्रण विभागाचे संकिर्ण २०२४/प्र.क्र.२०८/२४/तांशि ३ दि. २६/०८/२०२४.
३.तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १८/तंशिस/विका/बँक खाते/२०२४-२५/३७२ दि. १२/९/२०२४
४.उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे संकिर्ण २०२४/प्र.क्र.२०८/२४/तांशि ३ दि. ३०/९/२०२४.
५.उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे संकिर्ण २०२४/प्र.क्र.२०८/२४/तांशि ३ दि. ३/१०/२०२४.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या सर्व विनाअनुदानित संस्थांना संदर्भ २ च्या शासन पत्रानुसार व संदर्भ ३ च्या संचालनालयाच्या पत्रानुसार व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या विना अनुदानित संस्थांनी शिष्यवृत्ती रक्कम जमा होणा-या बँक खात्यामध्ये बदल केला असेत तर सदरहु बँके सोबत केलेल्या सामाजस्य कराराची प्रत, बँकेचे परवानगी पत्र, संस्थेचा मुळ अर्ज व या कार्यालयाचे शिफारस असल्यास सदर संस्थेचे बँकखाते बदल करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल असे आपणास कळविण्यात आलेले आहे.

संदर्भ ४ चे पत्रानुसार शासनामार्फत शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांना व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या शैक्षाणिक संस्थांकडुन शुल्क निश्चीत करण्यासंदर्भात शुल्क नियामक प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर केल्यास शुल्क निश्चीत करतांना संस्थेकडे असलेल्या खेळत्या भांडवलावरील व्याज (Work Capital Interest) सुध्दा विचारात घ्यावे अश्या सुचना शासनामार्फत करण्यात आलेल्या आहेत.

तसेच आपणास कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे संदर्भ १ च्या पत्रानुसार आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक संस्थांनी शिष्यवृत्तीची रक्कम जमा होणा-या बॅक खात्यामध्ये बदल केल्यास खालील कार्यवाही करण्याबाबत कळविलेले आहे.

१.शिष्यवृत्तीची रक्कम जमा होणा-या बँक खात्यामध्ये बदल केल्यास बँकेसोबत केलेल्या सामजस्य कराराची प्रत. बँकेचे परवानगी पत्र, संस्थेचा मुळ अर्ज या कार्यालयास सादर करावे.

२.शुल्क नियामक प्राधिकरण यांचेकडे शुल्क निश्चीती करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करतांना शिष्यवृत्तीची रक्कम जमा होणा-या बँकेचा खात्यामध्ये बदल केलेला असल्यास बँकेचा तपशिलासह उपरोक्त प्रमाणे कागदपत्रे शुल्क नियामक प्राधिकरणास सादर करावी.

याबाबत कार्यवाही करण्याचे संदर्भात संदर्भ १ ते ५ चे संदर्भिय पत्र जोडलेले आहे कृपया त्याचे अवलोकन करावे.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

**(मनोज म अंधारे)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर.** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

FIL

महाराष्ट्र शासन

तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६

ई-मेल–desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

महत्वाचे
परिपत्रक

जा. क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४/ 329
दिनांक :- 06/10/2024

विषय: व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या शैक्षणिक संस्थांनी शिष्यवृत्तीची रक्कम जमा होणाऱ्या बँक खात्यामध्ये बदल केल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ : १. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२०८/२४/तांशि-३, दि. २६/०८/२०२४.
२. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/विका/बँक खाते/२०२४-२५/३७२, दि:- १२/०९/२०२४.
३. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२०८/२४/तांशि-३, दि. ३०/०९/२०२४.
४. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२०८/२४/तांशि-३, दि. ०३/१०/२०२४.

उपरोक्त विषयान्वये व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व विनाअनुदानित संस्थांना संदर्भ क्र. (१) च्या शासन पत्रानुसार व संदर्भ क्र. (२) च्या संचालनालयाच्या पत्रानुसार सर्व सहसंचालक विभागीय कार्यालये यांना व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या विना अनुदानित संस्थांनी शिष्यवृत्ती रक्कम जमा होणाऱ्या बँक खात्यामध्ये बदल केला असेल तर, सदरहू बँके सोबत केलेल्या सामंजस्य कराराची प्रत, बँकेचे परवानगी पत्र,. संस्थेचा मुळ अर्ज व विभागीय सहसंचालकांची शिफारस असल्यास सदर संस्थेचे बँक खाते बदल करण्याबाबतची कार्यवाही संचालनालयामार्फत करण्यात येईल असे कळविण्यात आलेले होते.

संदर्भ क्र. (३) च्या पत्रानुसार शासनामार्फत शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांना व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या शैक्षणीक संस्थांकडून शुल्क निश्चिती करण्यासंदर्भात शुल्क नियामक प्राधीकरणाकडे प्रस्ताव सादर केल्यास शुल्क निश्चिती करतांना संस्थेकडे असलेल्या खेळत्या भांडवलावरील व्याज (Work Capital Interest) सुध्दा विचारात घ्यावे अश्या सुचना शासनामार्फत केलेल्या आहेत.

उपरोक्त शासन पत्र संदर्भ क्र. (४) च्या पत्रानुसार सर्व सहसंचालक विभागीय कार्यालये यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या विनाअनुदानीत संस्थांना खालील प्रमाणे कार्यवाही करणे बाबत सूचना देण्यात याव्या.

(१) शिष्यवृत्तीची रक्कम जमा होणाऱ्या बँक खात्यामध्ये बदल केल्यास बँके सोबत केलेल्या सामंजस्य कराराची प्रत, बँकेचे परवानगी पत्र, संस्थेचा मुळ अर्ज व सहसंचालक विभागीय कार्यालय यांचे शिफारसीसह संचालनालयास प्रस्ताव सादर करावा.

(२) शुल्क नियामक प्राधिकरण यांचेकडे शुल्क निश्चिती करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करतांना शिष्यवृतीची रक्कम जमा होणाऱ्या बँकेचा खात्यामध्ये बदल केलेला असल्यास बँकेचा तपशिलासह उपरोक्त प्रमाणे कागदपत्रे शुल्क नियामक प्राधिकरण यांना सादर करावीत.

उपरोक्त प्रमाणे परिपत्रक आपल्या विभागातील व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व विनाअनुदानीत संस्थांच्या निदर्शनास आणावे.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवाहीकरीता:

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर. यांना निर्देशित करण्यात येते की, आपल्या अधिनस्त व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व संस्थांना उपरोक्त परिपत्रकांतील सर्व सूचनांचे पालन काटेकोररित्या करण्यासाठी सूचित करावे.

प्रत माहितीकरीता:

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सादर.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
४ था मजला, मंत्रालय (विस्तार),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दुरध्वनी क्र:-०२२ २२०४०९३५ Email ID: tashi3-hied@mah.gov.in

क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२०८/२४/तांशि-३

दि:- २६ ऑगस्ट, २०२४

प्रति,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग,
मुंबई-४०० ००१.

विषय:-बँक ऑफ महाराष्ट्र, विभागीय कार्यालय, मुंबई यांचे प्रस्तावाबाबत...

संदर्भ:- आपले पत्र क्र.१८/तंशिसं/शा.प/बँक खाते/२०२४/३४७, दि.१२ ऑगस्ट, २०२४.

उपरोक्त विषयाबाबत आपल्या संदर्भाधिन दि.१२ ऑगस्ट, २०२४ च्या पत्राच्या अनुषंगाने असे कळविण्यात येते की, फी प्रतीपूर्ती प्राप्त करण्यासाठी बँक खाते उघडणे हा संबंधित महाविद्यालय/संस्थेचा विशेषाधिकार आहे. त्यामुळे विना अनुदानीत संस्थांनी शिष्यवृत्तीची रक्कम जमा होणा-या बँक खात्यामध्ये बदल केल्यास, सदरहू बँके सोबत केलेल्या सामंजस्य कराराची प्रत, बँकेचे परवानगी पत्र, संस्थेचे मुळ अर्ज व विभागीय सहसंचालकांची शिफारस असल्यास संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी सदर संस्थेच्या शिष्यवृत्ती बँक खात्यामध्ये बदल करण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(मनाली सामंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

AC

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन


# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ /४८७

ई-मेल—desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

रजिस्टर पोस्टाने/ई-मेलद्वारे

क्र:१८/तंशिसं/विका/बँक खाते/२०२४-२५/ ३७२
दिनांक: १२/०९/२०२४

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/ छत्रपती संभाजीनगर /अमरावती/नागपूर

विषय:- बँक ऑफ महाराष्ट्र, विभागीय कार्यालय, मुंबई यांचे प्रस्तावाबाबत..

संदर्भ :- १. बँक ऑफ महाराष्ट्र यांचा मा. प्रधान सचिव यांना सादर केलेला क्र. AX२/BDV/H&TE Dep/१/२०२४, Dt. २२/०७/२०२४ रोजीचा प्रस्ताव.

२. संचालनालयाचे शासनास पत्र क्र:१८/तंशिसं/शा.प/बँक खाते/२०२४/३४७, दि. १२/०८/२०२४.

३. उ. व तं. विभागाचे पत्र क्र. संकिर्ण -२०२४/प्र.क्र.२०८/२४/तांशि-३, दि. २६/०८/२०२४

उपरोक्त विषयान्वये व संदर्भ क्र. (१) नुसार बँक ऑफ महाराष्ट्र, विभागीय कार्यालय, मुंबई यांनी "Working Capital Demand Loan to Educational Institutes for Admin Expenses" या विषयाबाबत सादर केलेला प्रस्ताव संचालनालयामार्फत संदर्भ क्र. (२) नुसार शासनास सादर केलेला होता.

याबाबत उपरोक्त संदर्भीय क्र. (३) च्या अनुषंगाने शासनाव्दारे डीबीटी पोर्टलव्दारे फी प्रतिपूर्ती प्राप्त करण्यासाठी बँक खाते उघडणे हा संबंधित महाविद्यालय/संस्थेचा विशेषधिकार आहे. त्यामुळे विना अनुदानित संस्थांनी शिष्यवृत्तीची रक्कम जमा होणाऱ्या बँक खात्यामध्ये बदल केल्यास, सदरहू बँके सोबत केलेल्या सामजस्य कराराची प्रत, बँकेचे परवानगी पत्र, संस्थेचे मुळ अर्ज व विभागीय सहसंचालकांची शिफारस असल्यास सदर संस्थेचे बँक खाते बदल करण्याचा प्रस्ताव संचालनालयास सादर केल्यानंतर त्याबाबतची पुढील कार्यवाही (मंजूर/नामंजूर) संचालनालय स्तरावर करण्यात येईल.

सदर बाबत उचित कार्यवाही करण्याकरीता आपल्या विभागाअंतर्गत संस्थांना अवगत करावे.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

प्रत माहितीकरीता:
मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२. (लक्षवेध- मनाली सामंत, कार्यासन अधिकारी)

मंत्रालयीन सेवा

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
४ था मजला, मंत्रालय (विस्तार),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दुरध्वनी क्र:-०२२ २२०४०९३५ Email ID: tashi3-hted@mah.gov.in

क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२०८/२४/तांशि-३ दि:- ३० सप्टेंबर, २०२४

प्रति,
सदस्य सचिव,
शुल्क नियामक प्राधिकरण,
मुंबई.

विषय:- व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांनी शिष्यवृत्तीची रक्कम जमा होणाऱ्या बँक खात्यामध्ये बदल केल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत...

संदर्भ:- शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२०८/२४/तांशि-३, दि.२६ ऑगस्ट, २०२४.

महोदय,

व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांनी, शिष्यवृत्तीची रक्कम जमा होणाऱ्या बँक खात्यामध्ये बदल केल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत या विभागाच्या दि.२६/०८/२०२४ च्या संदर्भाकित पत्रान्वये संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांना कळविण्यात आले आहे. (प्रत संलग्न)

या अनुषंगाने आपणास कळविण्यात येत आहे की, व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या शैक्षणिक संस्थांकडून शुल्क निश्चिती करण्यासंदर्भात शुल्क नियामक प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर केल्यास शुल्क निश्चिती करताना या संस्थांकडे असलेल्या खेळत्या भांडवलावरील व्याज (Working Capital Interest) सुध्दा विचारात घ्यावे व ही बाब शुल्क नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर सुध्दा प्रदर्शित करावी.

आपली,
(मनाली सामंत) 30-9-2024
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित:-
१) मा.मंत्री (उ. व तं. शि.) यांचे विशेष कार्यकारी अधिकारी.
२) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई-४००००१.

3/10/24

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
४ था मजला, मंत्रालय (विस्तार),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दुरध्वनी क्र:-०२२ २२०४०९३५ Email ID: tashi3-hted@mah.gov.in

क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२०८/२४/तांशि-३ दि:- ०३ ऑक्टोबर, २०२४

पत्र प्राप्त झाले
03 OCT 2024
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई

प्रति,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग,
मुंबई-४०० ००१.

विषय:- व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांनी शिष्यवृत्तीची रक्कम जमा होणाऱ्या बँक खात्यामध्ये बदल केल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत...

संदर्भ:- १) शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२०८/२४/तांशि-३, दि.२६ ऑगस्ट, २०२४.
२) शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२०८/२४/तांशि-३, दि.३० सप्टेंबर, २०२४.

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधिन दि.३० सप्टेंबर, २०२४ च्या पत्रान्वये शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई या कार्यालयास सुचना देण्यात आल्या आहेत. (प्रत संलग्न)

२. तरी सदर सुचनांबाबत विस्तृत परिपत्रक तंत्रशिक्षण संचालनालय स्तरावरुन सर्व संस्थाचालकांच्या माहितीस्तव तात्काळ निर्गमित करावे. तथापि, प्रस्तावित परिपत्रकाची प्रत माहिती व अवलोकनासाठी विभागास सादर करावी. त्यानंतर सदर परिपत्रक निर्गमित करावे, ही विनंती.

(मनाली सामंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन